ISSN 2231-6671

International Registered and Recognized
Research Journal Related to Higher Education for all Subjects

# Hi-TECH RESEARCH ANALYSIS

EDITOR IN CHIEF
DR. BALAJI KAMBLE

IMPACT FACTOR 6.05

ISSN 2231- 6671

*International Registered & Recognized*

*Research Journal Related to Higher Education for all Subjects*

# Hi-TECH RESEARCH ANALYSIS

**UGC APPROVED & PEER REVIEWED RESEARCH JOURNAL**

**Issue : XIX, Vol. - II**
**Year - X, (Half Yearly)**
**Aug. 2019 To Jan. 2020**

**Editorial Office :**
'Gyandev-Parvati',
R-9/139/6-A-1,
Near Vishal School,
LIC Colony,
Pragati Nagar, Latur
Dist. Latur - 413531.
(Maharashtra), India.

**Contact : 02382 - 241913**
09423346913 / 09503814000
07276305000/ 09637935252

**Website**
**www.irasg.com**

**E-mail :**
interlinkresearch@rediffmail.com
visiongroup1994@gmail.com
mbkamble2010@gmail.com

**Published by :**
JYOTICHANDRA PUBLICATION
Latur, Dist. Latur - 413531 (M.S.)India

**Price : ₹ 200/-**

**CHIEF EDITOR**

**Dr. Balaji G. Kamble**
Research Guide & Head, Dept. of Economics,
Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya,
Latur, Dist. Latur.(M.S.) (Mob. 09423346913)

**EXECUTIVE EDITORS**

**Dr. Sunanda Rodge**
Principal
Govt. B.Ed. College,
Nanded, Dist. Nanded (M.S)

**Scott. A. Venezia**
Director, School of Business,
Ensenada Campus,
California, (U.S.A.)

**Dr. Omshiva V. Ligade**
Head, Dept. of History
Shivjagruti College,
Nalegaon, Dist. Latur.(M.S.)

**Bhujang R. Bobade**
Director Manuscript Dept.,
D. A. & C. Research Insititute,

**Dr. Dileep S. Arjune**
Professor & Head, Dept. of Economics
J. E. S. College,
Jalna, Dist. Jalna(M.S.)

**Dr. U. Takataka Mine**
Tokiyo (Japan)

**Dr. Babasaheb M. Gore**
Dean- Faculty of Education & M.C.
Member,S.R.T.M.U, Nanded.(M.S.)

**Dr. Nilam Chhanghani**
Dept. of Economics,
KNG Mahavidyalaya
Karanja Lad, Dist. Washim (M.S.)

**DEPUTY-EDITOR**

**Dr. G . V. Menkudale**
Dept. of Dairy Science,
Mahatma Basweshwar College,
Latur, Dist. Latur.(M.S.)

**Dr. C.J. Kadam**
Head, Dept. of Physics,
Maharashtra Mahavidyalaya,
Nilanga, Dist. Latur.(M.S.)

**Dr. Balaji S. Bhure**
Dept. of Hindi,
Shivjagruti College,
Nalegaon, Dist. Latur.(M.S.)

**Dr. Bharat S. Handibag**
Dean, Faculty of Arts,
Dr. B.A.M.U. Aurangabad(M.S).

**Dr. S.B. Wadekar**
Dept. of Dairy Science,
Adarsh College,
Hingoli, Dist. Hingoli.(M.S.)

**Dr. Shivaji Vaidya**
Dept. of Hindi,
B. Raghunath College,
Parbhani , Dist. Parbhani.(M.S.)

**CO-EDITORS**

**Dr. R.N. Salve**
Head, Dept. of Sociology,
Shivaji University,
Kolhapur, Dist. Kolhapur.(M.S.)

**Ghansham S. Baviskar**
Dept. of English,
RNC & NSC College,
Nasik, Dist. Nasik.(M.S.)

**Dr. Kailash Tombare**
Head, Dept. of Economics,
Devgiri Mahavidyalaya,
Aurangabad.(M.S.)

**Dr. Kailash R. Nagulkar**
Head, Dept. of History,
Gulab Nabi Azad College,
Barshi Takli, Dist. Akola.(M.S.)

ISSN 2231- 6671

*UGC Approved International Registered & Recognized Research Journal Related to Higher Education for all Subjects*

# Hi-TECH RESEARCH ANALYSIS

## MEMBERS OF EDITORIAL BOARD

**Dr. Ravinra T. Vaidya**
Dean, Faculty of Social Sciences,
S.G.B. Amravati University,
Amravati, Dist. Amravati.(M.S.)
**Dr. S.R. Nikam**
Chairman, BOS, Business Economics,
Pune University, Pune.(M.S.)
**Dr. Sadanand H. Gone**
Pricipal,
Ujwal Gramin Mahavidyalaya,
Ghonsi, Dist. Latur.(M.S.)
**R.D. Gholap**
Head, Dept. of English,
Art & Commerce College,
Vani, Dist. Nashik.(M.S.)
**Prashant Mothe**
Dept. of English,
Aadarsh College,
Omerga, Dist. Osmanabad. (M.S.)
**Dr. Milind Lokhande**
Dept. of Zoology,
Indira Gandhi (Sr.) College.
Nanded, Dist. Nanded(M.S.)
**Dr. Premchand Sirsat**
Dept. of Zoology,
K.S.K. Mahavidyalaya,
Beed, Dist. Beed.(M.S.)
**S.K. Gaike**
Dept. of Sociology,
Vasant Mahavidyalaya,
Kaij, Dist. Beed. (M.S.)
**Prof. Johrabhai B. Patel**
Head, Dept. of Hindi,
S.P. Patel College, Simaliya,
Godhra (Gujrat).
**Vinod N. Ganacharya**
Director, Physical Education,
B.Raghunath College,
Parbhani, Dist. Parbhani.(M.S.)
**Dr. Rjendra D. Ganapure**
Head, Dept. of Economics,
S.M.P. Mahavidyalaya,
Murum, Dist. Osmanabad.(M.S.)
**Dr. Sahebrao R. Chavan**
Head, Dept. of Economics,
G.S. College of Commerce,
Vardha, Dist. Vardha.(M.S.)
**Hema D. Makane**
Dept. of Zoology,
B. Raghunath Mahavidyalaya,
Parbhani, Dist. Parbhani.(M.S.)
**Dr. Laxman P. Wagh**
Head, Dept. of Defence Study,
M. J. College,
Jalgaon, Dist. Jalgaon (M.S.)
**Dr. Shivanand M. Giri**
Dept. of Marathi,
B.K.Deshmukh College,
Chakur, Dist. Latur.(M.S.)
**Prof. Sandip J. Nikam**
Dept. of English,
K.T.H.M. College,
Nashik, Dist. Nashik.(M.S.)

ISSN 2231-6671

*UGC. Approved International Registered & Recognized Research Journal Related to Higher Education for all Subjects*

# Hi-TECH
## RESEARCH ANALYSIS

**PEER REVIEW COMMITTEE**

Scott. A. Venezia (Sociology)
Dr. U. Takataka Mine (Archaeology)
Dr. Dileep S. Arjune (Economics)
Bhujang R. Bobade (Aerchaeology)
Dr. Balaji Kamble (Economics)
Dr. Balaji K. Shinde (Economics)
Dr. Nilam Chhangani (Economics)
Dr. Sahebrao R. Chavan (Economics)
Dr. Sunanda Rodge (Education)
Dr. Babasaheb M. Gore (Education)
Dr. Sadanand H. Gone (Geography)
Dr. Omshiva V. Ligade (History)
Dr. Nilam Chhanghani (Economics)
Dr. Ravindra T. Vaidya (History)
Vinod Ganacharya (Physical Education)
Veera Prasad (Political Science)
Dr. C.J. Kadam (Physics)
Dr. Khandersoji Kale (Sociology)
Dr. R.N. Salve (Sociology)
Dr. B.V. Bhosale (Sociology)
Dr. L.P. Wagh (Strategic Science)
Johrabhai B. Patel (Hindi)
Dr. Balaji S. Bhure (Hindi)
Dr. Shivaji Vaidya (Hindi)
Dr. Murlidhar Lahade (Hindi)
Dr. Laxman P. Wagh (Defence Study)
Dr. Shivanand M. Giri (Marathi)
Prof. Sandip J. Nikam (English)
Prashant Mothe (English)
R.D. Gholap (English)
Ghansham S. Baviskar (English)
Dr. Milind Lokhande (Zoology)
Dr. Premchand Sirsat (Zoology)
Dr. Prashant S. Salve (Commerce)

Issue : XIX, Vol. II
Hi-TECH RESEARCH ANALYSIS
IMPACT FACTOR 6.05
ISSN 2231- 6671
Aug. 2019 To Jan. 2020

# INDEX


| Sr. No | Title for Research Paper | Page No |
|---|---|---|
| 1 | Employee Attrition : Biggest Challenges for 21st Centure Organizations<br>**C. P. Kothawale** | 1 |
| 2 | Current Trends in HRM<br>**Dr. Dadasaheb Jogdand** | 5 |
| 3 | Sector wise impact of foreign direct investment in Indian Economy<br>**Dr. B. V. Halmandage** | 9 |
| 4 | The Role of News Papers in student's life - Special Reference to Nanded City<br>**Dr. Pachling S. Kishanrao** | 22 |
| 5 | Comparative Study of Personality Traits of Combative and Team Game State Level Players of Maharashtra<br>**Dr. Chandrajit Jadhav** | 27 |
| 6 | जैनेन्द्र - अनमेल विवाह तथा विधवा विवाह की समस्या<br>**डॉ. अरुणकुमार भंडारे** | 32 |
| 7 | बुलडाणा जिल्ह्यातील जलसिंचनाची साधने<br>**डॉ. राजु प्र. गवई** | 39 |
| 8 | डॉ. पंजाबराव देशमुख यांचे शैक्षणिक कार्य<br>**डॉ. ओमराज मधुकर गाजभिये** | 44 |
| 9 | राग - रागिनी टोडी की चित्रमाला में संगीत तत्व<br>**डॉ. सुरेंद्र शेजे** | 50 |
| 10 | 'बेरड' - अत्याचारी आणि गुन्हेगारी जीवनाची करुण व्यथा<br>**डॉ. सहदेव रसाळ** | 57 |
| 11 | महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांची राजकीय वाटचाल<br>**डॉ. रामदास नारायण फुलारी** | 65 |

Issue - XIX, Vol. II
HI-TECH RESEARCH ANALYSIS
IMPACT FACTOR 6.05
ISSN 2231- 6671
Aug. 2019 To Jan. 2020


10

# 'बेरड' - अत्याचारी आणि गुन्हेगारी जीवनाची करुण व्यथा

**डॉ. सहदेव रसाळ**
मराठी विभाग,
व्यंकटेश महाजन महाविद्यालय,
उस्मानाबाद, जि. उस्मानाबाद

## Research Paper - Marathi

महाराष्ट्र आणि कर्नाटक या सीमा भागामध्ये बेरड या जमातीचे वास्तव्य असलेले दिसून येते. जीवन जगण्यासाठी कुठल्याच प्रकारची साधने उपलब्ध नसल्यामुळे या जमातीतील लोक चोरी करतात. त्याचबरोबर जंगलातील लाकडे, फळे, शिकार करून आपली उपजीविका भागवितात. स्वभावत:च क्रूर असलेले बेरड सहजासहजी चोरीचा मार्ग स्वीकारत नाहीत. पण जगण्यासाठी कुठलाच पर्याय शिल्लक नसल्यास मात्र ते चोरी करतात.

कोणतेच नेतृत्व नसलेल्या, सैराभैरा अवस्थेत जगणाऱ्या या जमातीला किती दिशाहीन, उघडे-नागडे जीवन जगावे लागते याचे दर्शन 'बेरड' या आत्मकथनातून घडते. हजारो वर्षापासून डोंगरांमध्ये, जंगलामध्ये खितपत पडलेली ही बेरड जमात दोन वेळचे जेवण पोटभर घेऊ शकत नाही. आजही ही जमात मूलभूत गरजांपासून वंचित आहे. जन्मापासून या जमातीतील लोकांच्या माथ्यावर चोर म्हणून शिक्का मारलेला दिसतो. त्यामुळे पोलिसांचे अन्याय, अत्याचार पशुवत सहन करावे लागतात. कोठेही चोरी झालेली असेल तर त्याचा आरोप मात्र बेरडावरच होतो. बेरडांप्रती या व्यवस्थेतील कुठलीच व्यक्ती सहानुभूती दाखवत नसल्यामुळे या माणसांच्या मनामध्ये या व्यवस्थेविषयी आपुलकी निर्माण होण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. जगण्यासाठी ही माणसे काहीही करण्यासाठी मागे-पुढे पाहत नाहीत. चोरी, दारू काढणे, खून-मारामारी, पोलिसांकडून होणारी मारहाण, कोर्ट कचेरी या सर्व गोष्टी बेरडाच्या अंगवळणी पडल्या आहेत. देशाला स्वातंत्र्य मिळून कित्येक वर्षे लोटली पण विकासाची गंगा मात्र या माणसांपर्यंत पोहोचू शकली नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे परिवर्तनवादी विचार या जमातीपर्यंत आले नाहीत. शिक्षणाचे महत्त्व या माणसांना कधीही पटले नाही. अंधश्रद्धा, अज्ञान, गरिबी-दारिद्र्य, शोषण यामध्ये हा समाज चिरडला गेला आहे. पण याची

थोडीशीसुद्धा पर्वा या माणसांना नाही. सामाजिक, राजकीय अन्याय-अत्याचार मात्र हे गुमानपणे सहन करतात. घरामध्ये एखादी व्यक्ती आजारी पडली तर औषधापेक्षा ही माणसं देवावरच जास्त विश्वास ठेवतात. अशा महाभयानक कारुण्यामध्ये बेरडाचे जीवनक्रमण चालू आहे.

डोंगरामध्ये व जंगलामध्ये आपले एकूणच जीवन व्यथित करणारी ही वेरड जमात विकासापासून व मूलभूत गरजापासून कोसोमैल दूर आहे. माणूस असतानाही पशुवत मुर्दाड जीवन ते जगतात. पण यांच्याकडे मात्र या व्यवस्थेतील मनुवादी जाणीवपूर्वक दुर्लक्ष करतात. अज्ञान, दारिद्रय, विषमता याविषयीची कुठलीच खंत बेरडांना वाटत नाही. उलट ते असे म्हणतात शिक्षण शिकल्यामुळे आमची मुले काय शिक्षक होणार आहेत. लेखक म्हणतो,-''मी सहा-सात वर्षाचा असेन त्या वेळी माझे आजोबा वारले. त्या वेळी मी शाळेला जात नव्हतो. मास्तर मुलांना छडीने मारतो. वेरडाच्या पोरांना तर मरेपर्यंत मारतो. हे पाहून आजोबा म्हणत असत 'आमासनं कास पाजे साळा, आमचं प्वॉर सिकून काय मास्तर व्हणार हाय?' ' अज्ञानामध्ये भरकटलेला हा समाज शिक्षणापासून दूर आहे. ही व्यवस्था आपणाला अज्ञानामध्ये ठेवण्यास कारणीभूत आहे पण याची कुठलीच तक्रार नाही. हेच जीवन ते स्वखुशीने जगत आहेत. काही समाज सुधारकांचे परिवर्तनवादी विचारसुद्धा हे अंगीकारण्यास तयार नाहीत. कारण कोणताच इतर जातीचा परिवर्तनवादी विचार येथे आला नाही. म्हणूनच तर- ''डॉ. बाबासाहेब आंबेडकर महार असतील तर त्यांची जयंती आपण कशासाठी साजरी करायची'' अशी त्यांची भावना होते.अशा या अज्ञानामध्ये पिचलेल्या समाजामध्ये कमालीचे दारिद्र्य आहे. या दारिद्र्यामध्येच ते आपले जीवन व्यथित करतात. पण हे दारिद्र्य नष्ट करण्याची इच्छा मात्र त्यांच्यामध्ये निर्माण होत नाही. यासाठी भीमराव गस्ती हा तरूण मात्र अहोरात्र प्रयत्नरत असताना दिसतो. बेरड समाजातील अज्ञान व दारिद्र्य समाज माणसाला सुन्न करून टाकणारे आहे. या दारिद्र्यामध्ये होरपळत असलेल्या माणसांना न्याय देण्यासाठी भीमराव दंड थोपटून उभा आहे. लेखकाच्या घरात अठराविश्वे दारिद्र्य आहे. या दारिद्र्याचे चित्रण करताना लेखक म्हणतो-''पड्याच्या शिलाईचे पैसे जेव्हा आईकडे मागितले तेव्हा ती भडकून म्हणाली,'भडव्या, माझ्या वाराच्या बाजाराइतकं पैसं झालं की रं !' एकट्या संच इतकं पैसं झालं की रं ! एकट्या संच इतकं पैसा लागू लागलं तर आमी काय खातलं ?'' यातून या बेरड जमातीमध्ये दारिद्र्यातही तडजोड करून जीवन जगण्यासाठी धडपडणारी माणसे दिसून येतात.

'वेरड' ही जमात वेडर व क्रूर असल्यामुळे बेरडांच्या जातपंचायतीतील पंचांचा वचक इतर जातीवरही असलेला दिसून येतो. बेरड समाजातील मुलीला, मुस्लिम समाजातील मुलगा फूस लावून पळवून नेतो. त्या वेळेस मुस्लिम समाज व गावातील इतर लोक मात्र भेदरून जातात. वेरड लोक

मात्र आपली इज्जत गेली म्हणून भांडणारासाठी सज्ज होतात. हे प्रकरण पोलिसांत जाऊनही जात-पंचायत वसते व त्यानुरुप दंड आकारला जातो. ही जात पंचायत मात्र एकूण बेरडांचेच शोषण करणारी आहे. दंडाच्या रूपाने भरीव रक्कम घेऊन ती आपल्याच खिशात भरुन घेणारे पंच यात आहेत. पण याला विरोध करणे अवघड होते. विरोध केला तर जातीच्या बाहेर टाकण्याची भीती होती. त्यामुळे सहसा कोणीही विरोध करत नसे. जात पंचायतीच्या पंचाचा मुख्य हेतू हा दंड उखळण्याचाच असलेला दिसून येतो. याविषयी लेखक म्हणतो- '' किती दंड बांधतलं या दृष्टीने एकमेकाकडे पाहू लागले त्याचे ते आपसात चाललेले खलवत ऐकून मला जातपंचायतीबद्दल रागच आला. भागीचा नवरा तर घाबरूनच गेला. कशाला या बैठकीला आलो असं त्याला होऊन गेलं. अधीच बिचाऱ्याची बायको पळून गेलेली. पुन्हा ते नाही ते आरोप ठेवून, त्याला शुध्दा दंड.'' या जातपंचायतीच्या विरोधात लेखक मात्र एकटाच बोलतो पण याकडे कोणीही लक्ष देण्यास तयार नसते. उलट जात पंचायतीचे पंच हे लेखकाला अडचणीत आणू पाहतात. यातून बेरड समाजातील समाजमाणसांची वृत्ती-प्रवृत्ती लक्षात येते. बेरड या जातीवर चोरीचा आरोप ठेवून अमानुषपणे अत्याचार मोठ्या प्रमाणावर या व्यवस्थेतील मनुवादी प्रवृत्तीच्या माणसांनी केलेला आहे. बेरडांकडून गावातील सावकार, पाटील ही बडी मंडळी चोरी करवून घेतात. त्यातील अल्पसा वाटा बेरडांना देतात. यातील बहुसंख्य वाटा स्वतः हाडप करतात. पण पोलिसांना मात्र बेरडांनाच सामोरे जावे लागते. हा विचित्रपणा या व्यवस्थेतील माणसे करतात. बेरड म्हटलं की, त्यांच्याकडे चोर या दृष्टिकोनातूनच पाहिले जाते. लेखकाचा शाळेतील अनुभवही असाच. याविषयी लेखक म्हणतो, ''चोरी करणाऱ्या जातीत जन्मलो होतो म्हणून मीच चोरी केली असं सर्वांना वाटत होतं. माझ्या डोळ्यांतून अश्रू वाहत होते. मी हुंदके देत रडत होतो. 'कोणीतरी मुद्दाम माझ्या पिसवीत कंपासपेटी ठेवली आहे' हे सांगण्याचं धाडस त्या वेळी माझ्यात नव्हतं कारण चोरी करून पुन्हा खोटं बोलल्याबद्दल पुन्हा मार मिळेल ही एक भीती होती.'' अशी भीती या निरागस मनाला वाटते.गुन्हा नसताना सुद्धा या माणसाच्या अपप्रवृत्तीमुळे, कनिष्ठ जातीमुळे, चोर म्हणून अन्याय सहन करावा लागत होता. ही खंत भीमराव गस्ती यांनी व्यक्त केली आहे. शिक्षणसाठी वसतिगृहामध्ये असताना लेखकाच्या जवळचे पैसे पाहून मुले चोरीचा आरोप ठेवतात. वसतिगृह व्यवस्थापकाकडे हे प्रकरण गेल्यानंतर मात्र व्यवस्थापक लेखकाला खूप मार देतात. चोरी केली नसताना सुद्धा कांगे याने आरोप केल्यामुळे हे सर्वच घडले होते. अगोदरच लेखक जातीने बेरड त्यामुळे त्याच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन हा संशया होता. व या प्रकरणामुळे लेखक खूपच निराश झाला होता. तो पैसे गेल्यामुळे निराश नव्हता तर त्याच्यावर आलेल्या आरोपामुळे.या विषयीची मनातील खंत व्यक्त करताना लेखक म्हणतो -''कांगे अशा रीतीने माझ्यावर खोटंच आळ

ठेऊन माझ्याकडील वीस रुपये काढून घेईल असे वाटले नव्हते. माझे पैसे घेवून पुन्हा तो माझ्यावरच उपकार करतो असं तो व्यवस्थापकासमोर भासवित होता. या घटनेमुळे व्यवस्थापकांच्या नजरेत माझ्याविषयी घृणा दिसू लागली आणि ते मला सगळ्या मुलांसमोर ओरडू लागले,''मेहरबानी समज ! तुला वसतिगृहात ठेवून घेतलो आहे ते ? यापुढं चांगलं वागायला शिक ! नाहीतर सगळ्यांनाच चोरी करण्याचं शिकवशिल !'' कांगेनं अन्यायानं माझ्याकडील रुपये काढून घेतले याचं दु:ख मला वाटत नव्हतं. परंतु त्यानं माझ्यावरती खोटाच आळ ठेवला. या कृत्याचाच मला भयंकर संताप येत होता.'' हाच संताप मग शब्दरूप घेवून चळवळ उभी करण्यासाठी धडपडताना दिसतो. वेरडांकडे अशा पाहण्याच्या दृष्टिकोनातून समाजव्यवस्थेचे विंग उघडे पडते.

बेरडांमध्ये अंधश्रद्धेचा पगडा मोठ्या प्रमाणात असलेला दिसून येतो. देव-देवतांचे विधी करण्यामध्ये अमाप पैसा हे खर्च करतात. कर्ज घेऊन वेगवेगळे विधी पूर्ण करतात. 'ईर' काढण्याची प्रथा ही बेरड समाजाध्ये रुढ असलेली . यामध्ये वोकडांचा बळी दिला जातो. 'ईर काढण्यासाठी कापलेल्या बोकडांचे मांस भक्षण केल्यानंतर जुलाब व उलट्या होतात, त्यामुळे काही व्यक्ती असा समज निर्माण करतात की, ईर देव खूप कडक आहे. त्याची पूजा करत असताना काही चूक झाली असेल म्हणून हा देव कोपला आहे. याविषयीची समजूत व्यक्त करताना लेखक म्हणतो -''वैशाखाचं ऊन भाजून काढत होतं. जो तो जेवण करून आपल्या घराच्या कट्टयावर आणि चिंचेच्या झाडावुडी हुश्श करून टेकत होता! थोडा वेळ गेल्यानंतर काही लोकांना उलट्या-जुलाब सुरू झाले. ज्यांनी ज्यांनी जेवण केलं होतं त्या सर्वांनाच उलट्या सुरू झाल्या. कुणी भडाभडा ओकू लागला तर कुणी तांब्या घेऊन परसाकडे पळू लागला. कुणी 'अय्यो अय्यो' म्हणून ओरडू लागला. 'असं का झालं ?' लोकांच्यात चर्चा सुरू झाली. एक जण म्हणाला - 'ईर देव लई कडक हाय' त्याची पूजा करण्यात काय तरी घोळ झालाय. म्हणूनशानं सगळ्यांवर देव कोपलाय !'' बेरड समाजामध्ये व्यक्ती विवाह होण्याच्या अगोदर मृत्यू पावला तर त्याच्या आत्म्याला शांती भेटत नाही असा अंधविश्वास आहे. हा विश्वास इतका पक्का की, तो जातीच्याच नियमांनी करावा लागतो. अशाच एका अंधविश्वासाचे चित्रण करताना लेखक म्हणतो- ''लग्न नसताना मृतात्म्यास मुक्ती मिळत नाही. तो विधी करण्यास हवा, नाहीतर त्याचं भूत होऊन सगळ्यांना त्रास करणार ! तेव्हा लग्नाचे विधी पार पाडू लागले. प्रेताचे गाठोडे एका ठिकाणी ठेवण्यात आले. त्याच्या बाजूला यक्कीच्या झाडाची एक छोटीशी फांदी आणून त्या फांदीला वधू बनविलं. हळदकुंकू लावले. त्यानंतर त्या फांदीला मंगळसूत्रासारखी एक काळ्या मण्यांची माळ घालण्यात आली. कांकण भरविले. प्रेतावरही नवीन कापडाची घडी करून ठेवली. त्यानंतर सगळ्यांना अक्षता दिल्या. काही वेळानंतर त्या प्रेतावर आणि झाडाच्या फांदीवर

अक्षता टाकण्यात आल्या. हा सर्व विधी पार पाडत असताना यल्याची आई आक्रोश करीत होती. 'सुडगावात या यक्की फांदीशी लगीन करून घेयायचं तुझ्या नशिवात होतं काय रं माझ्या पोरा!' आणि ती छाती बडवडवून घेत होती. स्मशानात उभे असलेल्या सगळ्यांच्या डोळ्यात अश्रूंनी गर्दी केली होती.''

दारिद्र्यात आणि संकटात सापडलेली माणसे भीषण वास्तव परिस्थितीकडे पाठ फिरवितात. देव-देवातांच्या नावाने अनेक विधी करतात. देवावरील विश्वासामुळेच आपण जिवंत आहोत असा त्यांचा समज आहे. अशा या श्रध्देच्या जीवनाविषयी डॉ. वासुदेव मुलाटे म्हणतात,''देव, धर्म आणि श्रद्धा, अंधश्रद्धा हे त्यांचे जगण्याचे आधार असतात. यातूनच विविध अनिष्ट परंपरा आणि प्रथांचा जन्म होतो. त्याची ही एक चौकटच तयार होते. या चौकटीतच अख्खा समाज बंदिस्त झालेला असल्याने प्रत्येकालाच त्या चौकटीत जगणे भाग पडते, आवडते ते सोपेही असते, यातून आणखी काही नव्या गोष्टी येतात. उदा. उरुस, जत्रा, नवस-सायास त्यांची विविध मार्गाने फेड. मग कुणाच्या तरी अंगात एखादा देव, पीर, आई असे येते. कोंवड्या-वकऱ्यांना बळी, गुरे-ढोरे आणि मुले देवाच्या नावाने सोडणे, त्याच्याशी लग्न लावणे, जिवाचे हाल करून घेणे अनुषंगानेच कराव्या लागणाऱ्या गोष्टी आहेत.'' डॉ. वासुदेव मुलाटे यांनी या जमातीच्या अंधश्रद्धाळू जीवनावर संशोधक वृत्तीने प्रकाश झोत टाकला आहे. वेरड समाजावर अगदी पशुवत अन्याय, अत्याचार करणारे पोलीस प्रशासन यात पाहावयास मिळते. कोणाचीही चोरी झाली असेल तरीही बेरडांच्या लोकांना जबाबदार धरले जाते. तसेच कोणत्याही स्वरूपाचा गुन्हा घडला असेल तर त्याचे खापर मात्र वेरडांवर फोडले जाते. लेखक म्हणतो -''काकती पोलीस ठाण्यातील एका पोलिसाचे अपघाती निधन झाले. त्या पोलिसाला वेरडांनीच मारले असे भासवून त्या ठाण्याच्या फौजदाराने अनेक खेड्यातील बेरडांना पकडून त्यांचा अमानुष छळ केला. त्या पोलिसी अत्याचारात अनेक अपंग झाले, ते जीवनातून उठले. कित्येक वेरडमंडळी पोलिसांच्या या छळाला घाबरून आपली घरेदारे सोडून दूर कुठेतरी पळून गेली. हे सगळे वेरडावरील अत्याचार पाहून माझे मन बंड करून उठू लागले. परंतु आणीवाणी असल्यामुळे माझी अवस्था पिंजऱ्यात कोंडलेल्या वाघासारखी झाली. वेरडांचा होत असलेला छळ पाहून मला लगमाण्णाची आठवण झाली. लगमाण्णाचाही असाच छळ करण्यात आला होता. त्यातच तो बळी पडला होता.'' वेरडांच्या वाट्याला आलेल्या पोलीस अत्याचारामुळे ते वैतागून गेले आहेत. कुठल्याच प्रकारची तमा न वाळगता कोणताही गुन्हा नसताना दुसऱ्यावरील गुन्हे वेरडांवर लादून त्यांना वेकदरपणे मारझोड करणाऱ्या पोलीस यंत्रणेविषयी मनातील संताप व्यक्त करताना लेखक म्हणतो- ''डोंगरातील असाह्य वेरडांना कुत्र्या-मांजरासारखं मारून टाकणाऱ्या या सैतान पोलीस खात्याला कोण जाव

विचारणार ? लोकाचं लोकशाही सरकार तर त्यांचीच बाजू घेते. इतर समाजातील लोकांना तर बेरड म्हणजे चोर, खुनीच वाटतो. या चोरांना अशीच अद्दल घडविली पाहिजे असेही ते बोलून दाखवितात. जिकडं बघावे तिकडं आम्हा बेरडांविषयी सगळ्यांच्या नजरेमध्ये संशय, तुच्छता आणि हेटाळणी! याहून सगळेच आमच्यावर अन्याय करणारे ? कोण आहे आमचा ? आम्ही जगावे तरी कसे ? '' असे अनेक प्रश्न सृजनशिल मनाला पडतात. या व्यवस्थेतील जीवघेणी हेटाळणी, अन्याय, अत्याचार पाहून ते अंतर्मुख होतात.'बेरड' मधील बेरड समाज आपल्या न्याय्य हक्कांसाठी या प्रशासनाचा विरोध बंड करू पाहत आहेत. पण सर्वच आघाड्यांवर त्यांना दाबून ठेवण्याचा प्रयत्न होत आहे. त्यामुळे ते या प्रशासनाकडे कायदेशीरपणे न्याय मिळवण्यासाठी आंदोलने, मोर्चे करत आहेत. कारखान्यांमध्ये बेरड समाजातील माणसांना काम मिळावे म्हणून लेखक आंदोलन करतो. अंदोलनाने मनाचा उद्रेक जागृत होऊन हे मन समाज हितासाठी व त्याच्या अस्तित्वासाठी झगडत राहते. अशाच एका आंदोलनाच्या प्रसंगी लेखक अधिकाऱ्याला जे उत्तर देतो ते या जमातीतील वास्तवाची जाणीव करून देते. लेखक म्हणतो- ''साहेब ! आता आम्हाला चर्चा आणि आश्वासने नकोत. या सगळ्यांना काम देणार असाल तरच मी या लोकांना शांत करतो. केवळ चर्चा म्हटलं तर मला ते जमायचं नाही. आपण काय करायचं ते करा. आम्ही आता असेच या ठिकाणी थांबणार, तेही काम मिळेपर्यंत !'' मी माझ्या मनातील भावना सांगितल्या. माझे बोलणे ऐकून मॅनेजर व कलेक्टर एकमेकांशी काहीतरी कुजबुजले. लोकांचा आता गोंधळ जास्त वाढत होता. मॅनेजर माझ्यापाशी येऊन म्हणाले, 'हे पहा गस्ती, तुमच्या लोकांना उद्या ऑफिसकडे घेऊन या आम्ही त्यांना काम देण्याची व्यवस्था करतो.' ''

आपले हक्क मिळविण्यासाठी सुद्धा या व्यवस्थेविरुद्ध मोठा संघर्ष, बंड करावे लागते कारखान्यामध्ये बहुसंख्य लोकांची शेती गेली असताना सुद्धा यांना नोकरी नाही,कामधंदा नाही, बेकारीमध्ये जीवन व्यथित करावे लागते. त्यासाठी या व्यवस्थेविरुद्ध संघर्ष करावा लागतो. या व्यवस्थेविरुद्ध संघर्ष करण्यासाठी म्हणून लेखक एकूणच समाज संघटित करू पाहतो आणि त्याच्या माध्यमातून आपले प्रश्न सोडविण्यासाठी धडपडताना दिसतो.

समाज व्यवस्थेमध्ये 'बेरड' म्हणून जगताना जी ससेहोलपट भीमराव गस्ती व त्यांच्या समाजबांधवांच्या वाट्याला आली त्याचे सचित्र दर्शन घडते. पोलीस प्रशासनाचा अत्याचार, राजकीय दुर्लक्ष, सामाजिक अवहेलना, बेरडांमधील असंघटितता, असहकार्याची भावना, बेडर वृत्ती, समाजातील बड्या नेत्यांचा आपमतलबीपणा, यामध्ये चिरडल्या गेलेल्या समाजाच्या वाट्याला सर्व आघाड्यांवर निराशाच येते. डोंगरातील वस्त्यांमधून राहणाऱ्या या जमातीजवळ केवळ शेतीवर जगता येईल अशी

शेती नाही. शेती चांगल्या पद्धतीने करण्याचे कसबही नाही. म्हणून कोणी शेतात कामही देत नाही. यामुळे नशिवी येते ती हेळसांड आणि उपासमार. मग जगण्यासाठी धडपडताना दारू गाळावी लागते, लाकडाची मोळी डोक्यावर घेऊन बाजारचा रस्ता चालावा लागतो आणि जर हेही शक्य झाले नाही तर चोरीशिवाय पर्यायच उरत नाही. चोरी केली की गुरा-ढोरांप्रमाणे पोलिसांचा मार खावा लागतो. पोलीस खात्यात गुन्हेगार म्हणून जमातीची नोंद असल्याने कुठेही चोरी झाली की, मग महिना-दीड महिना बंद खोलीतली हवा खावी लागते. अशा या लाचार, अमानवी जीवनाचे चित्रण जेव्हा 'वेरड'मधून उभे राहते तेव्हा संवेदनशील मनही बंड करून उठायला तयार होते. अशा या जीवनात जीवनावश्यक गोष्टींचाही अभाव. मग शिक्षणाने काय फरक पडतो अशी मनाची दृढ भावना होते. शेवटी वाट्याला येते ते अज्ञान आणि दारिद्र्य. त्यातच पुन्हा जत्रा-खेत्रा-उरूस असल्याने जीवनात अवकळेची भरच पडत जाते. 'वेरड'मधल्या या लेखनाला वास्तवाचा, प्रामाणिकपणाचा गंध आहे. काही प्रसंग लेखकाने भावविवश होऊन चित्रित करण्यासारखे होते. मात्र तो कुठेही भावनेच्या आहारी गेलेला दिसत नाही. कारण लेखक सच्चा कार्यकर्ता आहे. कार्यकर्त्याच्या मनातली ही टसठस प्रश्न घेऊनच वाचकांच्या समोर येणार हेही नाकारता येत नाही. लेखकाच्या ठिकाणी आत्मभान तर आहेच पण बाणेदारपणाही आहे. म्हणूनच आत्मकथनातील निवेदन चिंतनशील झाले आहे. लेखकाचा मूळपिंडच समाजचिंतकाचा असल्याने अनेक सामाजिक प्रश्नांची उकल येथे झाली आहे. या सामाजिक बांधीलकीबरोबर संस्कृतीचे, जगण्याचे, आपापसातील हेव्या-दाव्यांचे दर्शन लेखकाने घडविले आहे. लेखक वेरडांमध्ये नेतृत्त्व उभे करू पाहतो. आयुष्याच्या या पडझडीचे, चळवळीचे, पडून पुन्हा उभे राहण्याचे चित्रण पाहिले की, लेखकाच्या अंगी असलेल्या जिदीचा आणि वैचारिकतेचा प्रत्यय येतो.

एक साहित्यकृती म्हणून 'वेरड'चे मोल बहुमोल आहे. एका सराईत ललित लेखकाने समाजाचा आलेख सचित्र उतरवावा अशी लेखकाची शैली आहे. लेखकाने जे पाहिले, भोगले, वाट्याला आले ते समाजाचा प्रतिनिधी म्हणून अत्यंत सामर्थ्याने रेखाटले आहे.

**निष्कर्ष :**

१. 'वेरड' या आत्मकथनातून वेरड जातीच्या वास्तव जीवनाचे चित्रण लेखकाने अत्यंत तटस्थपणे केले आहे.

२. 'वेरड' या आत्मकथनातून भुकेसाठी कराव्या लागणारी यातनामय संघर्षाची वेदना प्रांजळपणे चित्रित झाली आहे.

३. विमुक्त जमातीतील जात पंचायत म्हणजे अज्ञानी लोकांचा सूड घेण्यासाठी उभारलेली

असंविधानिक क्रूर संघटनाच आहे, हे या आत्मकथनातून प्रतीत झाले आहे.

४. दारिद्र्यात आणि संकटात सापडलेली माणसे भीषण वास्तवाकडे पाठ फिरवून अंधश्रद्धेच्या आहरी कसे जातात, हे लेखकाने सप्रमाण दाखवले आहे.

५. 'बेरड' या आत्मकथनातून महाराष्ट्र आणि कर्नाटक राज्यांच्या सीमा भागामध्ये बोलल्या जाणाऱ्या मराठी-कानडी मिश्रित भाषेचा प्रत्यय येतो, हे या आत्मकथनाचे सामर्थ्य आहे.

## संदर्भ सूची :-


१. भीमराव गस्ती : 'बेरड', पारख प्रकाशन, बेळगाव (कर्नाटक), आ.प.-१९८७

२. डॉ. ना.धो.कदम : 'महाराष्ट्रातील भटका समाज संस्कृती व साहित्य', प्रतिमा प्रकाशन, पुणे, आ.प. १९९५

३. डॉ. आरती कुसरे-कुलकर्णी : 'दलित स्वकथने : साहित्यरूप', विजय प्रकाशन, नागपूर, आ.प. १९९१

४. रामनाथ चव्हाण : 'जाती आणि जमाती', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, आ.ति., २०००

५. डॉ. वासुदेव मुलाटे : 'दलितांची आत्मकथने : संकल्पना व स्वरूप', स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, आ.प. १९९९